International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.8 No.4 March-April 2021

# किमान आधार किंमतीची प्रवृत्ती आणि वास्तविकता

**प्रा. डॉ. शिंदे एस. आर.**
(अर्थशास्त्र विभाग)
कला व वाणिज्य महाविद्यालय, पुसेगाव ता. खटाव जि. सातारा
**Email:** sangramshinde730@gmail.com

**प्रस्तावना:**

रॉजर थामस यांच्या मते, 'भारतीय शेतकऱ्यांचा पावसानंतरचा दूसरा मोठा शत्रू म्हणजे शेतमालाच्या किंमतीतील मोठे चढ उतार हा आहे.' तर नियोजन मंडळाच्या मते, 'शेती कसणाऱ्यांच्या उत्पादनावर आणि त्यांच्या कसण्यावर शेतमाल किंमतीचा मोठा परिणाम होत असतो. अर्थात भारतीय शेतमालाच्या किंमतीचा देशाच्या आर्थिक विकासावर फार मोठा प्रभाव पडत असतो. कारण औद्योगिक क्षेत्रात वापरण्यात येणाऱ्या कच्चा मालांच्या किंमती आणि अन्नधान्याच्या किंमती यांचा देशाच्या सर्वसाधारण किंमत पातळीवर मोठा प्रभाव पडत असतो. अन्नधान्याच्या किंमतीत चढ उतार होत असतील तर देशाच्या सर्वसाधारण किंमत पातळीत अस्थैर्य निर्माण होत असते. त्याचा प्रतिकूल परिणाम शेतकरी आणि देशाच्या आर्थिक वृद्धीवर होत असतो.

शेतमालाचा पुरवठा वाढला की, शेतमालाच्या किंमती कमी होतात आणि शेतमालाचा पुरवठा कमी झाला की, शेतमालाच्या किंमती वाढतात. या दोन्ही परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांचे नुकसान होत असते. त्यामुळे शेतमालाच्या किंमतीत स्थैर्य निर्माण करणे गरजेचे असते. केंद्र सरकार आणि राज्य सरकारे दरवर्षी शेतमालाच्या किंमतीत स्थैर्य निर्माण करण्याचा प्रयत्न करत असतात. परंतु स्वातंत्र्योत्तर कालखंडानंतर देशातील सरकारे ज्या पद्धतीने शेतमालाच्या किंमतीबाबत आणि शेतीच्या विकासा बाबत जेवढे गंभीर असावयास पाहिजे होते तेवढे नाहीत. कारण विकसित देशातील सरकारे ज्या पध्दतीने कृषिविषयक धोरणे व निर्णय घेतात त्या धोरणात राष्ट्रीयत्वाची भावना, आत्मीयता, आपलेपणा आणि सर्वात महत्वाचे म्हणजे अभ्यासू वृत्ती आणि दुरदृष्टीपणा दिसून येतो. जे आपल्या देशातील सरकारच्या धोरणात यापैकी कोणताही गुणधर्म दिसून येत नाही. या देशातील सरकारांनी आजपर्यंत जी आर्थिक धोरणे राबवली आहेत त्या धोरणात कृषिविकासाच्या दृष्टीने नकारात्मक भूमिकाच घेतल्याचे दिसून येते. उदा. पहिल्या पंचवार्षिक योजनेत एकूण योजना खर्चाच्या १५.९ टक्के हिस्सा शेतीच्या विकासासाठी होता तर ११ व्या पंचवार्षिक योजनेत एकूण खर्चाच्या केवळ ३.७ टक्केच हिस्सा होता[1]. तर पहिल्या पंचवार्षिक योजनेत कृषिक्षेत्राचा वृद्धीदर २.७१ टक्के होता तो अकराव्या योजनेत ३.२ टक्के होता. (लक्ष ४ % होते) म्हणजे कृषि क्षेत्राचा ७० वर्षात फारसा विकास झालेला दिसून येत नाही. त्यामुळे भारतातील शेती, शेतीमध्ये राबणारे शेतकरी, शेतमजूर यांचा विकास झालेला नाही. शेतीमधील समस्या कमी न होता त्या जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे वाढत आहेत. माझ्या मते देशातील सरकारांनी अभ्यासू वृत्तीने आणि तळमळीने शेतकऱ्यांचे, शेतीचे आणि ग्रामीण भागांचे हित करणारे धोरण राबविले तर भारतातील शेती क्षेत्रात ज्या समस्या आहेत त्या कमी होतील आणि जे शेतकरी आत्महत्या करतात ते अत्महत्या करणार नाही.

शेतमालाच्या किंमतीबाबत सरकारने योग्य अशी धोरणे राबविल्यास शेतकऱ्यांच्या अनेक समस्या कमी होतील, शेतीचे उत्पादन वाढेल आणि ग्रामीण भागांचा तसेच देशाचा विकास होईल. ही बाब लक्षात घेऊन भारत सरकार अनेक प्रयत्नही करत असते. शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य किंमत मिळेल यांची दक्षता सरकार घेत असते. तरीपण शेतमालाला रास्त भाव मिळण्यासाठी योग्य असे किंमत धोरण राबवणे गरजेचे असते. त्याला अनुसरून देशात शेतमालाच्या किंमतीबाबत योग्य धोरण कसे असावे याबाबत सरकारला सल्ला देणारी एक संघटना असावी असे मत अशोक मेहता आणि एल. के. झा समितीने शिफारस केली होती. या शिफारशीनुसार केंद्र सरकारने सन १९६५ मध्ये 'कृषीमाल किंमत आयोगाची' स्थापना केली. सध्या या आयोगाला 'कृषीमाल खर्च आणि किंमत आयोग' असे म्हणतात. CACP शेतकऱ्यांच्या आणि ग्राहकांच्या हिताचा विचार करून गहू,तांदूळ,ज्वारी,ऊस,कापूस,ज्यूट,तेलबिया,तंबाखू इ. २३ पिकांच्या हंगामापूर्वी हमीदत्त किंमती ठरविण्याची केंद्र सरकारला शिफारस करते. किंवा तसा सल्ला देते. हा सल्ला महत्वाचा मानून केंद्र सरकार MSP ठरवत असते. या किंमतीलाच किमान आधार किंमत असेही म्हणतात.

**उद्दिष्टे :**

**प्रस्तुत संशोधनाची खालील प्रमाणे उद्दिष्टे सांगता येतील.**

**१. आधारभूत किंमतीची संकल्पना समजावून घेणे**

**२. किमान आधारभूत किंमतीतील बदलांची प्रवृत्ती अभ्यासने**

**३. हमीदत्त किंमतीचा लाभ भारतातील किती शेतकऱ्यांना मिळाला आहे यांची माहिती घेणे**

**4. लाभार्थी शेतकऱ्यांचे प्रमाण वाढवण्यासाठी उपाययोजना सांगणे**

**संशोधन पध्दती:**

प्रस्तुत संशोधन दुय्यम साधनांवर आधारित आहे. दुय्यम साधनामध्ये इंटरनेट आणि सरकारचे अहवाल, क्रमिक व संदर्भ पुस्तके, मासिके याचा आधार घेतलेला आहे.

**गृहितके:**

१. किमान आधार किंमतीचा फायदा कमी शेतकऱ्यांना मिळतो.

**किमान आधार किंमत म्हणजे काय?**

MSP म्हणजेच Minimum Support Price यालाच मराठीत किमान आधार किंमत असे म्हणतात. किमान आधार किंमत म्हणजे सरकार शेतकऱ्यांना त्यांचा शेतमाल एक ठराविक किंमतीत खरेदी करण्याची हमी देते. बाजारात शेतमालाचा पुरवठा अवश्यकतेपेक्षा जास्त झाला तरी सरकारने अगोदर ठरवलेल्या किंमतीलाच शेतमाल खरेदी करावा लागतो. किमान आधार किंमत म्हणजे अशी किंमत की, जी सरकार खरीप व रब्बी हंगामापूर्वी म्हणजे पीक येण्यापूर्वी जाहीर करते. या किंमतीचा आधार घेऊन शेतकरी शेती उत्पादनाचे नियोजन करतो आणि निर्भीडपणे शेती उत्पादन करीत असतो. किमान आधारभूत किंमत म्हणजे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाला मिळालेला एक प्रकारे हमी भाव असतो. म्हणजे कधी शेतमालाचा पुरवठा वाढल्यामुळे किंवा घटल्यामुळे शेतमालाच्या किंमतीत जे चढ उतार होतात त्या चढ उताराचा शेतकऱ्यांवर कोणताही परिणाम होत नाही. किमान आधार किंमत विमा पॉलिसी सारखे काम करते. किंमत घटीमुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान MSP मुळे टाळता येते. या किंमतीलाच हमीदत्त किंमत असेही म्हणतात.

शेतकऱ्याने शेतीत केलेल्या कष्टाला योग्य मोबदला मिळावा, त्याचे कष्ट वाया जावू नये यादृष्टीने शेतकऱ्याने शेतीत उत्पादित केलेल्या शेतमालाला सरकारकडून आधार म्हणून ज्या किंमतीची हमी दिली जाते त्या किंमतीला आधार किंमत असे म्हणतात. किमान आधार किंमती या शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चाचा, शेतकऱ्यांच्या कष्टाचा विचार करून ठरविली जात असते.

**हमीभाव ठरवण्याची पध्दत:**

**हमीदत्त किंमत कृषीमाल खर्च आणि किंमत आयोगाच्या (CACP) शिफारशीनुसार भारत सरकारचं कृषि मंत्रालय ठरवत असत. त्यांनी ठरवलेली शेतमालाची हमीदत्त किंमत संपूर्ण देशात एकच असते. जसे एक क्विंटल ज्वारीची हमीदत्त किंमत जी महाराष्ट्रात असेल तीच किंमत आंध्रप्रदेशात असते.**

**सन २०१८ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादन खर्चाच्या दिडपट हमीभाव देण्याची घोषणा मा. प्रधानमंत्री यांनी केली होती. उदा. शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च रु. १००० असेल तर १५०० रुपये हमीभाव देणार असा याचा अर्थ होतो.**

**उत्पादन खर्च ठरवण्यासाठी केंद्रीय कृषि मूल्य आयोगाने जी सूत्र निश्चित केली आहेत. ती खालील प्रमाणे :**

**१. ए-२ : या सूत्रानुसार मजुरीवरील खर्च, बियाणे, रासायनिक खत, औषधे, इंधनावरील खर्च, सिंचन यावरील प्रत्यक्ष खर्च विचारात घेतले जाते.**

२. ए-२+ FL(family Labour)

**यामध्ये मजुरीवरील खर्च, बियाणे, रासायनिक खत, औषधे, इंधनावरील खर्च,सिंचन यावरील प्रत्यक्ष खर्च + शेतकरी आणि त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींच्या श्रम खर्चाचा यात विचार केला जातो.**

**३. सी-२ :**

**ए-२+ FL(family Labour)+गुंतवणुकीवरील व्याज आणि शेतजमिनीच भाडं या सर्व खर्चाची बेरीज करुन जो खर्च येतो त्या एकूण खर्चाचा विचार करून आधार किंमत ठरवली जाणे आवश्यक आहे . परंतु वर्तमान काळात जी आधार किंमत ठरवली जाते ती केवळ ए-२+FL विचार करून आधार किंमत ठरवली जाते असे कृषि तज्ञ डॉ. एम. एस. स्वामिनाथन यांचे मत आहे. एकूण खर्चाचा विचार करण्यासाठी वरील तिन्ही बाबींचा समावेश एकूण खर्चात केला पाहिजे. तरच शेतकऱ्यांना खरा न्याय मिळेल.**

किमान आधार किंमतीची प्रवृत्ती:

आधार किंमतीच्या बदलांचा विचार केल्यास असे दिसून येते की, उत्पादन खर्चात ज्याप्रमाणे वाढ होत आहे त्या प्रमाणात आधार किंमतीही वाढत आहेत.ही बाब खालील तक्तामध्ये स्पष्ट दिसून येते.

तक्ता क्र. १

किमान आधारभूत किंमतीतील बदलाची प्रवृत्ती

**किमान आधारभूत किंमती (प्रती क्विंटल रुपयेमध्ये)**

| **Commodity** | **2016-17** | **2018-19** | **2019-20** | **2020-21** | **Increase in MSP 2020-21 over 2019-20** | **% Increase in MSP 2020-21 over 2019-20** |
|---|---|---|---|---|---|---|
| **Kharif Crops** | | | | | | |
| Paddy | 1470 | 1750 | 1815 | 1868 | 53 | 2.9 |
| Jower | 1625 | 2430 | 2550 | 2620 | 70 | 2.7 |
| **Bajra** | **1330** | **1950** | **2000** | **2150** | **150** | **7.5** |
| Ragi | 1725 | 2897 | 3150 | 3295 | 145 | 4.6 |
| Maize | 1365 | 1700 | 1760 | 1850 | 90 | 5.1 |
| Tur | 5050 | 5675 | 5800 | 6000 | 200 | 3.4 |
| Moog | 5225 | 6975 | 7050 | 7196 | 146 | 2.1 |
| Urad | 5000 | 5600 | 5700 | 6000 | 300 | 5.3 |
| Groundnut | 4220 | 4800 | 5090 | 5275 | 185 | 3.6 |
| Sunflower Seed | 3950 | 5388 | 5650 | 5885 | 235 | 4.2 |
| Soyabean | 2775 | 3399 | 3710 | 3880 | 170 | 4.6 |
| Sesamum | 5000 | 6249 | 6185 | 6855 | 370 | 5.7 |
| **Niger seed** | **3825** | **5877** | **5940** | **6695** | **755** | **12.7** |
| Cotton | 3860 | 5150 | 5255 | 5515 | 260 | 4.9 |
| **Rabi Crops** | | | | | | |
| Wheat | 1625 | 1840 | 1925 | - | - | - |
| Barly | 1325 | 1440 | 1525 | - | - | - |
| Gram | 4000 | 4620 | 4875 | - | - | - |
| Masur | 3950 | 4475 | 4800 | - | - | - |
| Rapeseed& Mustard | 3700 | 4200 | 4425 | - | - | - |
| Safflower | 3700 | 4945 | 5215 | - | - | - |
| Toria | 3560 | 4190 | 4425 | - | - | - |
| Jute | 3200 | 3700 | 3950 | 4225 | 275 | 6.96 |
| Copra | 5950 | 7511 | 9521 | 9960 | 439 | 4.61 |
| Sugarcane | 230 | 275 | 275 | | | |

विपणन हंगाम २०१६-१७ ते २०२०-२१ या कालावधी दरम्यान विविध खरीप व रब्बी पिकांसाठी जाहीर केलेली किमान आधारभूत किंमत कशी वाढत गेलेली आहे हे वरील अकडेवारीवरून दिसून येते.या कालावधीत ज्या पिकांसाठी आधारभूत किंमती जाहीर केल्या त्यामध्ये सर्वाधिक वाढ ही- कारळ या खरीप हंगामातील पिकासाठी जाहीर केली होती. खरीप हंगामातील कारळे या उत्पादनाला २०१९-२० हा हंगामात ५९४० रुपये हमी भाव होता. तर २०२०-२१ या हंगामात या उत्पादनाला ६६९५ एवढा हमीभाव जाहीर केला. या दोन वर्षीच्या कालावधीत या पिकाच्या उत्पादनाला रुपये ७५५ एवढा हमीभाव वाढऊन दिला. ही वाढ १२.७ टक्के एवढी होती. त्या पाठोपाठ बाजरा या पिकांच्या MSP त वाढ झालेली दिसून येते. सन २०१९-२० या खरीप हंगामामध्ये बाजरीला २००० एवढा हमीभाव होता, तर २०२०-२१ या हंगामामध्ये त्यात वाढ होऊन रु. २१५० रुपये एवढा केला. ही वाढ १५० रुपये (७.५%) होती, तसेच जूटचा हमीभाव हाही सातत्याने वाढत गेल्याचे दिसून येते. सन २०१९-२० या रब्बी पिकांची किंमत १९५० रुपये होती त्यात वाढ करून २०२०-२१ मध्ये ४२२५ रुपये एवढी झाली, ही वाढ २७५ (६.९६%) एवढी होती.

अशा प्रकारे इतर सर्व पिकांची एमएसपी सातत्याने वाढलेली दिसून येते ही वाढ कमी अधिक असली तरीही शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च भरून निघून निव्वळ नफा मिळाल्याचे दिसून येते.

**आकृती १: 2019-20 मध्ये MSP वर खरेदी केलेल्या पीक उत्पादनाची टक्केवारी**




वास्तव हे आहे की, देशातील एकूण शेतकऱ्यापैकी केवळ सहा टक्के शेतकऱ्यांना MSP चा लाभ मिळतो ही बाब गंभीर आणि विचार करावयास लावणारी आहे. याशिवाय काही ठराविक पिकांनाच MSP चा फायदा होतो. वरील स्तंभालेखात कोणत्या पिकांची किती खरेदी केली गेली यांची माहिती मिळते. सन २०१९-२० मध्ये MSP वर खरीदी केलेल्या तांदूळ या उत्पादनाचे प्रमाण ४३ टक्के आहे तर गहू या पिकांच्या उत्पादनाची खरीदी केलेले प्रमाण ३६ टक्के आहे तसेच डाळी या उत्पादनाची MSP वर खरीदी केलेले प्रमाण १२ टक्के आहे. याचाच अर्थ इतर पिकांचे उत्पादन केलेल्या शेतकऱ्यांना MSP चा लाभ मिळत नाही आणि मिळाला तर तो फारच कमी मिळतो म्हणूनच आपल्या देशातील शेतकरी आणि शेतीची दैनिय अवस्था दिसून येते. या दैनिय अवस्थेतून शेतकरी बाहेर पडण्याचा प्रयत्न करतो तरीपण काही शेतकरी या अवस्थेतून बाहेर पडण्यास अयशस्वी होतात,त्यातून हताश, निराश होतात आणि शेवटी आत्महत्या करीत असतात.

तक्ता क्र. २.

२०२१-२२ या वर्षातील रब्बी पिकांच्या MSP त वाढ:

| पिके | **MSP २०२०-२१ रुपये/दर क्विंटल** | **MSP २०२१-२२ रुपये/क्विंटल** | **उत्पादन खर्च २०२१-२२रुपये/दर क्विंटल** | **MSP त वाढ रुपये/दर क्विंटल** | **खर्चावरील परतावा** |
|---|---|---|---|---|---|
| गहू | १९२५ | १९७५ | ९६० | ५० | १०६% |
| बार्ली | १५२५ | १६०० | ९७१ | ७५ | ६५% |
| हरभरा | ४५७५ | ५१०० | २८६६ | २२५ | ७८% |
| मसूर | ४८०० | ५१०० | २८६४ | ३०० | ७८% |
| रेपसीड आणि मोहरी | ४४२५ | ४६५० | २४१५ | २२५ | ९३% |
| कुसुम | ५२१५ | ५३२७ | ३५५१ | ११२ | ५०% |

वरील तक्तातील आकडेवारीवरून असे स्पष्ट होते की, २०२० च्या तुलनेत २०२१-२२ या वर्षातील पिकांच्या उत्पादन खर्चापेक्षा त्या पिकांना किंमत / MSP जास्त मिळाली आहे आणि ती उत्पादन खर्चाच्या दुप्पटीपेक्षा जास्त आहे.

**किमान आधार किंमतीचा किती शेतकऱ्यांना लाभ मिळाला:**

किमान आधार किंमतीचा फायदा किती शेतकऱ्यांना मिळाला याची कल्पना खालीलप्रमाणे येते. खालील आकडेवारीचे विश्लेषण केल्यास असे दिसून येते की, खरीप विपणन हंगाम 2020-21 मध्ये किमान आधारभूत मूल्यानुसार पिकांची खरेदी होत असून आत्तापर्यंत 54.78 लाख शेतक-यांना त्याचा लाभ झाला आहे. त्यांच्याकडून एमएसपी दराने 84178.81 कोटी रुपयांची खरेदी करण्यात आली आहे.

तक्ता क्र. ३.

| अ. क्र. | वर्ष | पिकांचा प्रकार | प्रमाण | MSP ने खरेदी केलेले एकूण मूल्य (कोटी रूपये) | लाभार्थी शेतकरी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २४.१२. २०२०-२१ | मुग, उडीद,भुईमुगीच्या शेंगा,सोयाबीन | २२,६२५८ मेट्रिक टन | १२११४६ लाख रुपये | १२३०१९ |

**प्रा. डॉ. शिंदे एस. आर.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २. | २०.१२. २०२०-२१ | कापसाच्या गाठी (गासड्या) | 58,35040 | 17090.58 कोटी रुपये | 1125857 |
| ३. | २०.१२.२०२० | तांदूळ | 415.37 लाख मेट्रिक टनापेक्षा जास्त तांदळाची | 78423.17 कोटी रुपये | 4896692 |

वरील आकडेवारीवरून असे दिसून येते की, खरीप विपणन हंगाम 2020-21 मध्ये किमान आधारभूत मूल्यानुसार पिकांची खरेदी होत असून आत्तापर्यंत 48.96 लाख शेतक-यांना त्याचा लाभ झाला आहे. त्यांच्या धान्य खरेदीसाठी 78423.17 कोटी रुपये दिले आहेत.

खरीप विपणन हंगाम २०२०-२१ मध्ये कापूस महामंडळाने किमान आधार किंमतीला १७०९०.५८ कोटी रुपयांच्या कापसाच्या ५८३५०४० गाठी (गासडया) खरेदी केल्या. याचा ११२५८५७ कापूस उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना लाभ झाला. सर्वाधिक लाभ पंजाब, हरियाना,राज्यस्थान तेलंगना, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश,मध्यप्रदेश, ओडिसा,कर्नाटक, गुजरात या राज्यातील शेतकऱ्यांना झाला. याच कालावधीत मुग,उडीद,भुईमूग सोयाबीन यांचीही खरेदी MSP ने करून १२११४६ लाख रु. दिले गेले. त्याचा १२३०१९ शेतकऱ्यांना फायदा झाला. यावरून असे दिसून येते की, समग्र देशातील एकूण शेतकऱ्यांचा विचार केल्यास हा फायदा अगदी नगण्य आहे. ही बाब ठळकपणे दिसून येते.

**किमान आधार किमतीचा फायदा अधिक शेतकऱ्यांना मिळून देण्यासाठी उपाययोजना:**

**१. विक्रीयोग्य वाढवा वाढविणे:**

भारतातील शेतकऱ्यांचा विक्रीयोग्य वाढवा वाढविण्यासाठी त्यांच्या शेती उत्पादनात वाढ करणे गरजेचे आहे. त्यासाठी शेतकऱ्यांच्या शेतीमध्ये जलसिंचनाच्या सुविधेत वाढ केली पाहिजे तरच शेतकरी वर्षभरासाठी स्वतःच्या आणि कुटुंबाच्या उपजीविकेएवढे अन्नधान्य घरी ठेऊन शिल्लक उत्पादन बाजारपेठेमध्ये विक्रीसाठी आणतील त्यातून त्याला हमीभावाचा लाभ मिळेल

**२. दळणवळणाच्या सुविधेत वाढ करणे:**

शेतकरी आपला शेतमाल मुख्य बाजारपेठेत आणून विकण्यासाठी शहरापासून खेड्यापर्यंत पकया रस्त्यांची सुविधा करणे, वाहतुकीचे साधने वाढवल्यास, ट्रॅक्टर छोटे टेम्पो, ट्रक इत्यादि शेतमालची वाहतूक करणारी साधने उपलब्ध झाल्यास शेतकरी आपला शेतमाल जिल्हा पातळीवरील मुख्य बाजारपेठेत आणून MSP ला विकून अधिक फायदा मिळवू शकेल

**३. पतपुरवठ्याची सुविधा:**

भारतातल्या शेतकऱ्यांना कमीत कमी दराने कर्ज उपलब्ध करून दिल्यास शेती मध्ये गुंतवणूक वाढून शेतीची दर हेक्टरी उत्पादकता वाढून विक्री योग्य वाढावा वाढेल त्यातून शेतकऱ्याला MSP चा लाभ मिळेल

**४. हमीभावाची माहिती देणे:**

भारतातील बहुसंख्य शेतकरी ग्रामीण भागात राहत असल्यामुळे आणि ते अज्ञान असल्यामुळे त्यांना शेतमालाच्या MSP ची माहिती नसते. त्यामुळे बहुसंख्य शेतकरी खेड्यातच मिळेल त्या किंमतील आपला शेतमाल विकतात त्यामुळे शेतकऱ्यांना MSP ची माहिती दिल्यास आपला शेतमाल MSP ला विकतील.

**५. कृषि विपणन व्यवस्थेतेतील दोष दूर करणे:**

भारतीय कृषी विपणन व्यवस्थेत असणारे प्रमुख दोष म्हणजे मध्यस्थाची मोठी साखळी, अडत्याकडून शेतकऱ्यांचा पिळवणूक, शेतमालाची किंमत ठरवताना मध्यास्थाकडून वापरण्यात येणारी चुकीची पद्धत (सांकेतिक पद्धत) इत्यादि दोष दूर केल्यास शेतकऱ्यांना आपला शेतमाल हमीभावाला विकणे सोपे होईल.

**६. साठवणुकीच्या सुविधा उपलब्ध करून देणे:**

शेतकऱ्यांच्या शेतमालाला हमीभाव मिळेपर्यंत साठवणुकीच्या सुविधा सर्वत्र उपलब्ध करून दिल्यास तो आपला शेतमाल कवढीमोल किंमतील न विकता हमीभाव मिळेपर्यंत आपला शेतमाल गोडाऊन मध्ये साठून ठेवेल.

**७. कायदेशीर कार्यवाही:**

शेतकऱ्यांचा शेतमाल किमान आधारभूत किंमतीलाच विकत घेतला गेला पाहिजे. यापेक्षा कमी किंमतीला शेतमाल खरेदी केली तर त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही केली जाईल अशी भिती बाजारातील विकेत, मध्यस्थ इ. मध्ये निर्माण झाली पाहिजे. तरच शेतकऱ्यांची पिळवणूक थांबेल आणि शेतकऱ्यांचा फायदा होईल.

वर उल्लेख केल्याप्रमाणे भारतातील एकूण शेतकऱ्यापैकी केवक ६ टक्के शेतकरींनाच किमान आधारभूत किंमतीचा लाभ मिळतो. त्यामुळे संशोधकाने घेतलेले गृहीत कृत्य खरे आहे.

अशा प्रकारे शेतकऱ्यांना किमान आधार किंमतीचा योग्य प्रमाणात लाभ मिळाला तर तो पुढील वर्षी पिकांची विविधता वाढवून अधिक पिके लागवडीखाली आणेल, किमान आधारभूत किंमती या विम्याची भूमिका बजावत असल्यामुळे शेतकऱ्यांना

MSP मुळे एक प्रकारचा विश्वास निर्माण होतो. त्यातून शेतीचे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल आणि त्यामुळे त्यांची खरेदीशक्ति वाढेल आणि ग्रामीण भागाचा विकास होईल.

**संदर्भ सूची ग्रंथ**


1. आर्थिक पाहणी २०१९ (केंद्रीय)
2. Cabinet Committee on Economic Affairs (CCEA) Minimum Support Prices (MSP) for Kharif Crops for marketing season 2020-21 Posted On: 01 JUN 2020 5:47PM by PIB Delhi
3. https://x.com/BJP4India/status/1308281939636305920/photo/1
4. व्यावसायिक पर्यावरण- डॉ. एस. एम. भोसले, डॉ. आर. जी. कोरबू, प्रा. जे. ए. यादव
5. किमान आधारभूत किंमत (एम.एस.पी.) अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन वेबसाईट
6. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१८-१९
7. किसान आंदोलन की दशा और दिशा -किसन पटनायक
8. *इकॉनॉमिक टाइम्स पीटीआय. 24 फेब्रुवारी 2021.*
9. केंद्रीय अर्थसंकल्प २०१९
10. *24 सप्टेंबर 2020, कृषी खर्च आणि किमती आयोग, कृषी आणि सहकार विभाग, कृषी मंत्रालय.*